REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 2 | NOVEMBER - 2018

# संतसाहित्य आणि समाज



जाधव ए. जे.
सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग प्रमुख श्री संत दामाजी महाविद्यालय, मंगळवेढा.

## सारांश

महाराष्ट्र ही संत महंतांची भूमी म्हणून ओळखली जाते. सातशे-आठशे वर्षापासून महाराष्ट्राच्या भूमीतील प्रत्येक माणसाच्या हृदयपटलावर संतांनी अधिराज्य गाजवले आहे. हृदयातील आचार- विचारांवर विठठल भक्तीचा आणि एकतेचा संस्कार संतांनी आपापल्या परीने केला आहे.

मध्ययुगीन मराठी साहित्य वारकरी संप्रदायातील संतमंडळीनी समृद्ध केले आहे. संतमंडळी विठ्ठलाचे भक्त असल्याने ते विठ्ठल दर्शनासाठी पंढरपूरची वारी पायी करतात त्यामुळे त्यांना वारकरी किवा वारकरीसंप्रदाय म्हणून संबोधले जाते. भागवत धर्माची स्थापना संत ज्ञानेश्वरांनी केले म्हणून भागवत संप्रदाय असेही संबोधले जाते. यालाच भक्ती संप्रदाय किवा संत संप्रदाय असेही संबोधले जाते. याच संत मंडळींमध्ये सर्व जाती धर्मातील संतांनी आपले योगदान दिलेले असल्याने सर्व समाजाच्या व्यथा आणि वेदना विठ्ठल भक्तीच्या माध्यमातून चित्रित झाल्या आहेत त्यामुळे खऱ्या अर्थाने संत साहित्यात समाजदर्शन अवतरले आहे

## उद्दिष्टये

१) संत साहित्याचा अभ्यास करणे.
२) संत साहित्यातील सामाजिक संदर्भाचा अभ्यास करणे.

## संशोधन पद्धती

प्रस्तुत शोधनिबंधसाठी दुय्यम साहित्याचा आधार घेण्यात आला आहे. प्रस्तुत शोधनिबंधात विश्लेषण पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

## प्रस्तावना

विठो माझा लेकुरवाळा |
संगे लेकुरांचा मेळा |
जनी म्हणे गोपाळा |
करी भक्ताचा सोहळा || - संतजनाबाई

संत जनाबाईची ओवी संतानसाठी तंतोतंत खरी ठरते. संत ज्ञानेश्वरांनी भागवत संप्रदायाची स्थापना केल्यापासून अध्यात्माचे धडे देण्याचे कार्य संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत तुकोबा, संत निळोबापर्यंतच्या

म्हणजे जवळपास पाच दशकापर्यंत वारकरी संतांच्या विचार व कार्याने केत्रे आहे.

संतांनी लोकभाषेतून साहित्याची निर्मिती केल्याने मराठी साहित्यात अभिजात व संस्कारक्षम साहित्य निर्माण झाले. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव इ. संतानी वारकरी संप्रदायाच्या अध्यात्मिक विचारधारा व तत्वज्ञानाचा आधार घेऊन सर्वसामान्य लोकांना भक्ती आणि मुक्तीचा अधिकार बहाल करून दिला. समाजात न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला. त्यामुळेच संतसाहित्य आणि संतांचे विचार समाजात आजतागायत तग धरून आहेत.

## संत शब्दाचा अर्थ

संत हा मूळ संस्कृत भाषेतून मराठीत आलेला आहे. हा शब्द प्राचीन काळापासून भारतीय धर्मशास्त्रात प्रचलित आहे. जनहितासाठी आपले आयुष्य समर्पण करणाऱ्या महापुरुषांना 'संत' हे नामाभिधान प्राप्त झाले आहे. थोडक्यात ज्या व्यक्तीच्या अंगी बुद्धिमत्ता, परोपकारीवृत्ती, सदाचार, सत्यता इ. अनेक गुणांचा समन्वय आहे त्यांना संत ही उपाधी दिल्ली जाते. मराठी साहित्याचा विचार केल्यास संत ह्या शब्दाचा उल्लेख संत मुक्ताबाइ यांच्या 'ताटीच्या अभंगात' आलेला पाहायला मिळतो. त्याचबरोबर संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत मेळ्यातील संत एकनाथ, निळोबाराय बहिणाबाई या सर्व संतांनी आपले विचार मांडले आहेत. संतसाहित्य लिहिले आहे त्या मधूनही संतांचे व्यक्तिमत्व संत लक्षणांच्या पाऊलखुणा आपणास पहावयास मिळतात. थोर संत नामदेव असे म्हणतात की,

ब्रह्ममूर्ती संत जगी अवतरले |
उद्धारवया आले दीन जगा|| - संत नामदेव

म्हणजेच संत नामदेवांच्या या अभंगातून त्यांच्या आत्माविष्कारातून अध्यात्मक्षेत्रातील अत्यंत मोलाचे विचार अत्यंत भावपूर्ण, उत्कट पद्धतीने व्यक्त झाले आहेत. ज्या व्यक्तीने काम, क्रोध, मोह, मत्सर, लोभ अशा षंढविकाराला जिंकले ज्याच्या व्यक्तिमत्वात दया-क्षमा-शांती आणि करुणा हे गुण आहेत तोच खरा संत होय असे संत एकनाथ म्हणतात

जे का रंजले गांजले| त्यासी म्हणे आपुले||
तोचि साधू ओळखावा| देव तेथेचि जाणावा|- संत तुकाराम

संत या शब्दाचे अध्यात्मिक क्षेत्रात भगवान, श्री, महात्मा, योगी, भल, संत, समर्थ, महंत, स्वामी, गुरु किंवा सद्गुरू साधू, शिवशरण, आचार्य, आनंद चैतन्य, नाथ, राज, प्रभू, देवी, महाराज इ. उपाधी त्या-त्या क्षेत्रातील अधिकारी नावाआधी लावण्याची प्रथा आहे. याचाच अर्थ असा की संत या शब्दाचे गहन अर्थ करून त्यांना मानवी जीवनात अपार महत्त्व आहे. यावरून संता या शब्दाची व्यापकता सहजच लक्षात येते.

संतमंडळींनी आपले आयुष्य विठ्ठल भक्ती बरोबरच लोक कल्याणाकरिता वाहून घेतलेले होते. निस्वार्थीपणे लरोकउद्धारासाठी कार्य हाती घेतले होते. अखंड नामस्मरण, मनोभावे विठ्ठलभक्ती ही संतांची वैशिष्ट्ये सांगता येतील. समाजात उदारता, मानवतावाद आणि मानवी मूल्यांची पायाभरणी संताने केली. त्यामुळेच तेराव्या शतकापासून आज एकविसाव्या शतकापर्यंत संतांचे विचार समाजात टिकून आहे. समाजात संतांच्या सद्गुणांचामुळे दया-क्षमा-शांती आणि नीतिमत्ता याची पायाभरणी केली गेली आहे.

बोले तैसे चाले। त्याची वंदावी पाऊले॥

या उक्तीप्रमाणे महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि धामिक जडण-घडणीत संत साहित्याचे अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. विविध जाती-धर्माच्या लोकांचा समावेश संत मंडळींमध्ये असल्याने मराठी

साहित्य समृद्ध बनले आहे. ते वाङ्मयीनदृष्ट्या अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण बनले आहे. मध्ययुगीन संतांचे काव्य हे ओवी, अभंग, भारुड, गवळणी इ. रचनेतून निर्माण झाले आहे. त्यामुळे या संप्रदायातील ज्या ज्या संतानी आपल्या साहित्यातून जी जी अनुभूती अभिव्यक्त केली आहे, ती जितकी लोकिकही आहे असे वाटते तितकेच ती अलोकिकही आहे. त्यामुळे संतांचे विचार शतकानुशतके दीपस्तंभासारखे प्रकाशमान करणारे आहे.

## संत परंपरा

भागवत संप्रदायाचा उगम महाराष्ट्रात झाला. संत ज्ञानेश्वरांनी या संप्रदायाची स्थापना केली. संत नामदेवांनी हा संप्रदाय महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेर पंजाबपर्यंत पोहोचविण्याचे मोलाचे कार्य केले संत तुकाराम हे या संप्रदाय परंपरेचे सर्वात मोठे आदर्श संत म्हणून मानले जातात. त्याच बरोबर त्यांच्या शिष्या संत बहिणाबाई आणि निळोबाराय यांच्यापर्यंत ही परंपरा पुढे चालत आलेली दिसते.

संत ज्ञानेश्वर यांची भावंडे, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम व त्यांचा शिष्यपरिवार यांनी संतसाहित्यात मोलाची भर घातली आहे. त्यामुळे संत साहित्याचे भांडार समृद्ध झाले आहे. संतांनी जी साहित्यनिर्मिती केली ती इतर साहित्यपेक्षा वेगळी आहे. कारण संतसाहित्य संकल्पनेत काव्यलक्षणे, काव्यप्रयोजने, निर्मितीप्रक्रिया रूढ साहित्यशास्त्राला प्रमाण मानून साकारलेले आहे.

संतांनी आपली साहित्य निर्मिती पद्यात केलेली आहे. त्यात त्यांनी मोठ्या प्रमाणात ओवी आणि अभंगसारख्या छंदाचा वापर केला आहे. त्यामुळे गेयस्वरूपात साहित्य निर्मितीला चालना देण्याचं महत्त्वाचं काम संतांनी केले आहे. त्यामुळेच त्यांचे साहित्य लोकप्रिय झालेले पहावयास मिळते.

परिणामस्वरूपी संतांचे विचार अठरापगड जातीत ते रुजले व फोफावले. समाजजीवनाच्या सर्वच स्तरातून अनेक संत निर्माण झाले. त्यांनीही साहित्य निर्मिती केली. त्यांना शक्य होईल अशा भाषेत साध्या सोप्या रचना करून साहित्य निर्माण केल्या आणि वर्णव्यवस्थेने निर्माण केलेले श्रेष्ठ-कनिष्ठतत्वाचे भाव नाकारले. त्यामुळे समाजात एकात्मतेची आणि निकोपाचे भावना निर्माण होण्यास मदत झाली. संत साहित्याने जातीव्यवस्था, वर्णव्यवस्था, अस्पृश्यता, रूढी-परंपरा, अंधश्रद्धेची लागलेली कीड मानवतावादी मूल्यांच्या आधारे घालवता येते अशी विश्वात्मक शिकवण समग्रमानवी जीवनाला दिलेली आहे. संस्कृत साहित्याला जे शक्य झाले.

## संतसाहित्य आणि समाजदर्शन

संतानी सर्वसामान्यांची भाषा म्हणून मराठीतून संत साहित्याची निर्मिती केत्री. त्यामुळे सर्व सामान्य माणसांना संतसाहित्य मार्गदर्शक, उद्बोधक आणि प्रेरक ठरते. संतसाहित्य केवळ धार्मिक तत्वचिंतन नाहीतर स्वतंत्र साहित्य मूल्य जोपासणारे आहे. त्याचबरोबर अस्सल ग्रामीण बोलीचा वापरही त्यात झालेला आहे. वारकरी संप्रदायाने मराठी भाषा साहित्य आणि संस्कृतीच्या दृष्टीने प्रत्येक मराठी माणसाच्या मनात अंतकरणात मोहिनी घातलेली आहे. कारण संतसाहित्य हे तात्कालीन समाजजीवनातील रूढी, प्रथा, परंपरा आणि लोकजीवनाच्या जडण-घडणीतून जीवनानुभवातून उदयास आलेले आहे.

संतसाहित्य हे तात्कालीन कालखंडातील समाजातील अंधश्रद्धा, अज्ञान, जातीव्यवस्था आणि जातीय ताणतणावाच्याही परिस्थितीतून जन्माला आलेले आहे. संतांनी समाजात एकता निर्माण करण्यासाठी सर्वसामान्य माणसांचे दुभंगलेले मन हेरले आणि सर्वे जाती, धर्मातील लोकांना आपल्या भक्ती रूपी मायेच्या पदराखाली घेऊन साहित्याच्या माध्यमातून त्यांच्यावर प्रेम, करुणा, दया आणि सहानुभूतीचा संस्कार केलेला

आहे. म्हणजेच अठरापगड जाती धर्मातील लोकांना चंद्रभागेच्या तीरावर भगव्या ध्वजाखात्री आणून विठ्ठल भक्तीचा नामघोषाचा संदेश देऊन सामाजिक पार्श्वभूमी बदलण्याचा यथोचित प्रयत्न केलेला आहे. तात्कालीन सामाजिक पार्श्वभुमी बदलण्याचा प्रयत्न केला.

## स्त्रीपुरुष समानता

तत्कात्रीन सामाजिक परिस्थितीत स्त्री-पुरुष असमानता होते. सित्रियांबद्दल आत्मीयता ही नव्हती. समाजात पुरुषप्रधान संस्कृतीचे वर्चस्व असल्याने समाजात स्त्रियांना दुय्यम स्थान होते. 'चूल आणि मूल असे त्यांचे कार्यक्षेत्र समाजाने ठरवून दिलेले होते. समाजाने निरनिराळी बंधने स्त्रियांवर लादलेली होते. ही बंधने संत मंडळींना अस्वस्थ करीत होते. त्यामुळेच संतांनी आपल्या अभंगाच्या माध्यमातून स्त्रियांची महत्ता वर्णन केली. तिला समाजव्यवस्थेत आदराचे स्थान दिले. या संदर्भात संत ज्ञानेश्वर आपल्या अमृतानुभव या ग्रंथात म्हणतात की

स्री-पुरुष नामभेदे | शिवपण ऐकले नांदे || -संत ज्ञानेश्वर

संत ज्ञानेश्वरांचा आदर्श घेऊन स्त्री-पुरुष समानतेला संतमंडळींनी अनन्यसाधारण महत्त्व दिले. आणि स्त्रियांबद्दल समाजाचा असलेला विकृत दृष्टिकोन बदलण्याचाही प्रयत्न केला. संतांनी लोकउद्वारासाठी भजन, कीर्तन आणि प्रवचनाच्या माध्यमातून लोकमेळा जमविला. समाजातील अंधश्रद्धा, मोह, माया, दंभ, अहंकार अशा समाजघातक मानवी विकृतीला पायबंद घालून सामाजिक परिस्थिती बदलण्याचा प्रयत्न केला. मध्ययुगीन काळातील समाजव्यवस्थेचा धर्म हाच कणा होता. धर्माला तत्कालीन समाजव्यवस्थेत अनन्यसाधारण महत्त्व होते. याचाच गैरफायदा घेऊन वैदिक धार्मिकानी वैदिक संस्कृतीचे स्तोम माजविले आणि संस्कृत भाषेतून ग्रंथरचना करून धर्मासंबंधी विचार मांडले. सर्वसामान्य समाजाला समजणाऱ्या मराठी भाषेचा वापर न करता बहुजन, स्त्री शूद्रदी समाजाला धर्मापासून अलिप्त ठेवले.

परिणामी समाजात रूढी, परंपरा, व्रतवैकल्य, नवस-सायास, सोवळे-ओवळे अशा समाजविघातक धार्मिक बाबींना महत्त्व प्राप्त झाले. म्हणूनच अशा कर्मठ, धार्मिक जीवनापासून दूर घेऊन जाण्याचा प्रयत्न संत ज्ञानेश्वरांनी पसायदानाच्या माध्यमातून विश्वबंधुत्वाची कल्पना मांडून केलेला आहे. त्यांच्याच पावलावर पाऊल टाकून सर्व संतांनी सर्वांना पचेल अशा धार्मिक तत्त्वांची पायाभरणी केली. मुसलमानी आक्रमणांचा परिणाम होऊन हिंदूंच्या धर्मावर, संस्कृतीवर आणि समाजजीवनावर होऊन समाज अधोगतीकडे चाललेला होता. त्यामुळे समाजाचे होत असलेले अधःपतन रोखण्यासाठी धर्म सुधारणे शिवाय पर्याय नव्हता. धार्मिक कर्मकांड यांच्या नावावरती होत असलेले शोषण नष्ट करणे. सर्व समाजाला आपुलकी वाटेल असे, धर्माला उदार आणि व्यापक स्वरूप देणे. लोकांना नैतिक मूल्यांवर आधारित उपासना मार्ग दाखविण्याचे काम सर्व संतमंडळींनी केले. धर्मसाधनेला ब्राह्मण धर्माची पोथीनिष्ठ चौकट त्यांनी मोडून टाकण्याचा प्रयत्न केला. संतांनी तत्कालीन काळात भरकटलेल्या समाजाला नामभक्ती आणि भक्तीसुखाचे महत्त्व पटवून दिले. तत्कालीन कालखंडातील राजकीय परिस्थितीवर मात करण्यासाठी समाजातील लोकांच्या मानसिकतेत बदल घडवण्याची ताकद निश्चितच संतांच्या विचारात आहे.

## संतसाहित्य

संत साहित्य हे वारकरी संप्रदायाचे भूषण आहे. संतशिरोमणी संत नामदेव हे खऱया अर्थाने भागवत संप्रदायाचे पहिले प्रचारक होते. लोकभाषेतून वाङ्मय निर्मिती करणे हे वारकरी संप्रदायाचे प्रमुख प्रेरणा स्रोत

आहे. धर्म ज्ञानापासून वंचित समाजाला साध्या सोप्या मराठी भाषेत संस्कृत भाषेतील ज्ञान देण्याचे काम संत मंडळींनी मराठी भाषेत साहित्य निर्मिती करून मराठी भाषेला महत्त्व प्राप्त करून दिले. समाजात जाचक जातिव्यवस्था होते. उच्चचवर्णीययांचे वर्चस्व होते. तत्कालीन समाजजीवन ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र अशा वर्णव्यवस्थेत विभागलेले होते. शूद्र जातीतील व्यक्तींना पशुतुल्य, अपमानास्पद वागणूक दिली जात होते. जातीय हिंदुत्वाचे दुःख संत चोखोबा, संत कर्ममेळा यांच्या अभंगातून प्रतीत झाले आहे.

सुख पाहता जवाएवढे |

दुःख पर्वताएवढे | |

अशा या दुःखी जीवनापासून कायम स्वरूपाचे सुटका करून घेण्यासाठी विठ्ठलभक्तीचा साधा सोपा मार्ग साहित्याच्या माध्यमातून संतमंडळींनी सांगितला. अर्थात मोक्षप्राप्ती म्हणजे आत्मवृत्त किंवा परमेश्वरी साक्षात्कार. या मोक्षप्राप्तीसाठी वारकरी संप्रदायातील सर्व संतमंडळी त्यांचे अनुयायी विठ्ठलाचे निस्सिम भक्ती करतात. तत्कालीन कालखंडात समाजातील जातीव्यवस्था, वर्णव्यवस्था, वैदिकधर्माचे वाढते प्रस्थ, सनातनी धर्म, पांडित्यपूर्ण लेखन, वैदिक परंपरेतील यज्ञ व कर्मकांड, सामाजिक विषमता, इस्लाम-यावनी आक्रमणे उच्चवर्णीयचे वाढते महत्त्व. अशा विविधांगी कारणांमुळे मानवतावादी मानवी मूल्य हे पायदळी तुडवली जात होते. त्यामुळे समाजात नैतिकतेचे वातावरण निर्माण झाले होते. अशा परिस्थितीत संताने स्वतंत्र, समता, बंधुता, न्याय, आपुलकी, जिव्हाळा, प्रेम, मानवता या मूल्यांची जोपासना साहित्य निर्मितीच्या साह्याने केले. अशाप्रकारे संत साहित्य हे तत्कालीन कालखंडातील बिकट अशा सामाजिक, राजकीय, धार्मिक आणि सांस्कृतिक परिस्थितीतून जन्मलेले अपत्य आहे.

संतांनी समाजातील जातीव्यवस्था व वर्णव्यवस्था, अस्पृश्यता यांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी लेखणी हाती घेतलेली. संतानी धर्म सुधारणांना चळवळीचा पाया घालून हिंदू धर्म रक्षणाचे ही काम केले आहे.

## निष्कर्ष

१) संत साहित्याने महाराष्ट्राच्या सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक आणि राजकीय जडणघडणीत मोलाचे योगदान दिले आहे.

२) संत साहित्याने मध्ययुगीन मराठी साहित्य समृद्ध बनविले आहे.

३) संत साहित्य धर्मप्रधान आणि संप्रदायनिष्ट आहे.

४) वारकरी संप्रदायाची भक्तपरंपरा ही भक्त पुंडलिका पासून दिसून येते. भक्त पंडलिकनी आपल्या भक्तीच्या जोरावर विठ्ठलाला अठ्ठावीस युगे

   १. विटेवर उभे केले अशी लोककथा आहे.

५) संत ज्ञानेश्वरांनी वारकरी संप्रदायाचा पाया घातला. संत नामदेवांनी त्याचा प्रचार आणि प्रसार केला आणि संत तुकाराम महाराजांनी कळस रचल्याचे कार्य केले.

६) संतांनी आपले कुटुंब, आपला व्यवसाय सांभाळत विठ्ठल भक्तीचा मळा फुलविला. संत एकनाथांनी समाजातील केवळ एका वर्गासाठी साहित्य निर्मिती न करता पंडित व विद्वानांसाठी चतुर भागवत आणि एकनाथीभागवत यांची निर्मिती केली. मध्यमवर्गीयासाठी रुक्मिणीस्वयंवर आणि भावार्थरामायण याची निर्मिती केली. समाजातील सर्वसामान्य लोकांसाठी साध्या सोप्या भाषेत भारुडाची निर्मिती केले.

७) संतांनी विविध समाजघटकांसाठी त्यांच्या बौद्धिक क्षमतेनुसार साहित्याची निर्मिती करून एक प्रकारे संतसाहित्याचे दालन समृद्ध करण्याचे काम केले. संत तुकारामांची भूमिका कर्त्या समाजसुधारकाबरोबरच जातिवंत साहित्यिकाची ही आहे हे त्यांच्या उदाहरणावरून लक्षात येते.

आम्हा घरी धन |<br>
शब्दांचीच राणे |<br>
शब्दाचीच शस्त्रे यत्ने कर ||

८) संत संप्रदायातील संत मंडळींमध्ये सुशिक्षितपासून अशिक्षितापर्यंत आणि ब्राह्मणांपासून शूद्रांनपर्यंत अशा सर्व जाती-धर्मातील लोकांनी साहित्य निर्मिती करून संत संप्रदायाच्या साहित्यामध्ये मोलाची भर घालण्याचे काम केले.

## समारोप

संत मंडळींमध्ये ज्याप्रमाणे पुरुष संतांनी पुढाकार घेतला त्याचप्रमाणे स्त्रियांनी सुद्धा आपलं योगदान संतसाहित्यामध्ये दिलेले आहे. त्यामुळे संतसाहित्य चारही बाजूने समृद्ध होण्यास मदत झाले. संत मंडळींमध्ये सर्वसामान्य समाजातील लोकांचा भरणा मोठ्या प्रमाणावर असल्यामुळे सर्वसामान्यांच्या भावभावना त्यांचे आचार-विचार त्यांच्या मनातील संवेदना त्यांच्या अभंग किंवा ओव्यातून उत्कटतेने प्रकट झालेल्या आहेत. त्यामुळे उत्स्फूर्त भावनांचा उद्रेक' अशा प्रकारच्या साहित्याची निर्मिती झालेले आहे. त्यामुळे संतसाहित्य हे सर्वसामान्य वारकऱ्यापासून सुशिक्षित किंवा विद्वान पंडितांनपर्यंत सहज साध्या सोप्या भाषेत पोचविण्याचे कार्य संतमंडळीने केलेले आहे. त्यामुळेच संत साहित्य वर्षानुवर्षे समाजामध्ये टिकले, रुजले, फोफवले व वारकरी संप्रदायात प्रत्येकाच्या मुखा मुखातून प्रकटले. त्यामुळे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे ते प्रवाहित झाले आणि त्याचमुळे संत साहित्य आजतागायत लोकांच्या मुखोदवत असल्यामुळे ते टिकून असलेले दिसून येते.

## संदर्भग्रंथ सूची

१) डॉ. मोरे सदानंद, वारकरी साहित्य भूमिका आणि स्वरूप, सावित्रीबाई फुले प्रकाशन, पुणे.
२) डॉ. तापकीर संदीप, संतांचे भक्ती आंदोलन, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती **2013.**
३) मंचरकर र.बा. धर्मसंप्रदाय आणि मध्ययुगीन मराठी वाड्मय, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती **2000.**
४) नासिराबदकर ल. रा., प्राचीन मराठी वाड्मयाचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, पाचवी आवृत्ती **1994.**
५) डॉ.मंचकर र.बा., संतसाहित्याच्या वाड्मयीन अभ्यासाच्या दिशा, संपादक डॉ. काळे कल्याण, नगरकर, स्नेहवर्धन प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती **1992.**
६) पठाण यु. म.,महाराष्ट्राची संतपरंपरा, दिलिपराज प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती **2012.**
७) सुठणकर बा.रां., महाराष्ट्रीय संतांचे ऐतिहासिक कार्य, लोकवाड्मयगृह, मुंबई, तिसरी आवृत्ती **2008.**